स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**

सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२
Website :www.doa.maharashtra.gov.in Email:dirdoa.mum-mah@gov.in/ directorateofart@gmail.com/higherartexam@gmail.com

क्रमांक- डिओओ/२०२३/चार/ 755 दिनांक : 15 MAR 2023

वाचावे : १) कला संचालनालयाचे परिपत्रक क्र.डिओओ/२०२३/चार/४१८, दिनांक १६.०२.२०२३
२) कला संचालनालयाचे परिपत्रक क्र.डिओओ/२०२३/चार/५२०, दिनांक २३.०२.२०२३
३) कला संचालनालयाचे परिपत्रक क्र.डिओओ/२०२३/चार/६७८, दिनांक ०८.०३.२०२३

## परिपत्रक

## शासकीय उच्चकला परीक्षा २०२३

[परीक्षेसाठी लागणारे साहित्य व परीक्षा शुल्काबाबत.]

शासकीय उच्चकला परीक्षा २०२३ करिता परीक्षा केंद्रांची व सहभागी कला संस्थांची ऑनलाईन नोंदणी तसेच केंद्रांमार्फत व सहभागी कला संस्थांमार्फत विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी/ परीक्षा आवेदनपत्रे व परीक्षा शुल्क संबंधीत लिंकद्वारे ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी संदर्भिय क्र. १ वरील दिनांक १६.०२.२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये परीक्षा केंद्रांना व सहभागी कला संस्थांना कळविण्यात आले होते. सदर परिपत्रकासोबत अभ्यासक्रमनिहाय परीक्षा शुल्काचा तक्ता माहितीकरिता जोडण्यात आला होता.

विषयाच्या अनुषंगाने मा. कला संचालकांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९.०३.२०२३ रोजी आयोजित करण्यात आलेल्या हंगामी परीक्षा मंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे. त्यानुसार परीक्षा केंद्रांनी व सहभागी कला संस्थांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

१. शासकीय उच्चकला परीक्षा २०२३ करिता परीक्षेस लागणारे साहित्य (इंटरमिजिएट स्कल्प्चर अॅन्ड मॉडेलिंग, डिप्लोमा स्कल्प्चर अॅन्ड मॉडेलिंग, डिप्लोमा टेक्स्टाईल -प्रिंटींग अॅन्ड डाईंग व डिप्लोमा टेक्स्टाईल - विव्हींग या अभ्यासक्रमासाठी लागणारे साहित्य वगळून) परीक्षा केंद्रांनी त्यांच्या स्तरावर खरेदी करावे. सदरचा खर्च भागविण्याकरिता संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रतिविद्यार्थी परीक्षा शुल्कातून ३०% रक्कम वजा करावी व उर्वरीत ७०% परीक्षा शुल्क कला संचालनालयाकडे ऑनलाईन पध्दतीने जमा करावे.

२. सहभागी कला संस्थांनी, संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रतिविद्यार्थी परीक्षा शुल्काच्या ३०% रक्कम (इंटरमिजिएट स्कल्प्चर अॅन्ड मॉडेलिंग, डिप्लोमा स्कल्प्चर अॅन्ड मॉडेलिंग, डिप्लोमा टेक्स्टाईल -प्रिंटींग अॅन्ड डाईंग व डिप्लेमा टेक्स्टाईल - विव्हींग या अभ्यासक्रमाचे शुल्क वगळून) साहित्य खरेदी करण्यासाठी संबंधित परीक्षा केंद्राकडे जमा करावी व उर्वरीत ७०% परीक्षा शुल्क कला संचालनालयाकडे ऑनलाईन पध्दतीने जमा करावे.

३. कला संचालनालयाकडे संबंधित अभ्यासक्रमाकरिता प्रतिविद्यार्थी जमा करावयाची ७०% रक्कम/शुल्क व परीक्षा केंद्राकडे साहित्य खरेदी करण्यासाठी ठेवावयाची ३०% रक्कम/शुल्क याबाबतचे विवरणपत्र-अ माहितीकरिता सोबत जोडले आहे. त्यानुसार परीक्षा केंद्रांनी व सहभागी कला संस्थांनी पुढील कार्यवाही करावी.

४. वरीलप्रमाणे परीक्षा केंद्रांनी स्वत:च्या व सहभागी कला संस्थेच्या विद्यार्थ्यांना संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी लागणाऱ्या साहित्यासह परीक्षा साहित्य खरेदी करावे.

५. परीक्षा केंद्रांनी व सहभागी कला संस्थांनी विवरणपत्र-अ व विवरणपत्र-ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे परीक्षेचे शुल्क कला संचालनालयाकडे ऑनलाईन पध्दतीने एकत्रितपणे जमा केल्यानंतर केंद्रांना व सहभागी कला संस्थांना विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमनिहाय आसन क्रमांक त्यांच्या लॉग इन वर उपलब्ध करुन देण्यात येईल.

६. इंटरमिजिएट स्कल्प्चर अ‍ॅन्ड मॉडेलिंग, डिप्लोमा स्कल्प्चर अ‍ॅन्ड मॉडेलिंग, डिप्लोमा टेक्स्टाईल -प्रिंटींग अ‍ॅन्ड डाईंग व डिप्लोमा टेक्स्टाईल-विव्हींग या अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी लागणारे साहित्य कला संचालनालयाकडून संबंधित परीक्षा केंद्रांना वाटप केले जाईल. त्यामुळे, सदर अभ्यासक्रम असणाऱ्या संबंधित परीक्षा केंद्रांनी व सहभागी कला संस्थांनी सदर अभ्यासक्रमाकरिता ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या परीक्षा शुल्काबाबतचे विवरणपत्र-ब माहितीकरिता सोबत जोडले आहे. त्यानुसार परीक्षा केंद्रांनी व सहभागी कला संस्थांनी पुढील कार्यवाही करावी.

७. सैध्दांतिक विषयांच्या परीक्षेसाठी लागणाऱ्या उत्तरपत्रिका कला संचालनालयाकडून परीक्षा केंद्रांना पाठविण्यात येतील.

(नागेश वाघमोडे)
परीक्षा नियंत्रक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१) अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.
४) प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय कला संस्था. (महाराष्ट्र राज्य)

प्रत,

१) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) निवड नस्ती

## कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
## शासकीय उच्चकला परीक्षा २०२३
## परीक्षा शुल्क- विवरणपत्र-अ

| अ.क्र. | परीक्षा/अभ्यासक्रम | परीक्षा शुल्क (शासन निर्णयानुसार प्रति विद्यार्थी शुल्क) | परीक्षेचे साहित्य खरेदी करण्यासाठी केंद्रांनी स्वत: कडे ठेवावयाचे प्रतिविद्यार्थी शुल्क/रक्कम (३०%) * | केंद्रांनी व सहभागी कला संस्थांनी कला संचालनालयाकडे ऑनलाईन पध्दतीने जमा करावयाचे प्रति विद्यार्थी परीक्षा शुल्क (७०%) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 1 | Foundation | 440 | 132 | 308 |
| 2 | Art Teacher Diploma- First Year (Revised/New Syllabus) | 620 | 186 | 434 |
| 3 | Art Teacher Diploma- Second Year (Revised/New Syllabus) | 640 | 192 | 448 |
| 4 | Intermediate Drawing & Painting | 960 | 288 | 672 |
| 5 | Diploma Drawing & Painting | 1410 | 423 | 987 |
| 6 | Intermediate Applied Art | 960 | 288 | 672 |
| 7 | Diploma Applied Art | 1410 | 423 | 987 |
| 8 | Diploma Interior Decoration | 960 | 288 | 672 |
| 9 | Diploma in Art Education | 1040 | 312 | 728 |
| 10 | Art Master Certificate | 640 | 192 | 448 |
| 11 | Art Teacher Diploma- First Year (Old Syllabus) | 620 | 186 | 434 |
| 12 | Art Teacher Diploma- Second Year (Old Syllabus) | 640 | 192 | 448 |

* सहभागी कला संस्थांनी रकाना क्रमांक ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे साहित्य खरेदी करण्यासाठी प्रतिविद्यार्थी शुल्क/रक्कम केंद्र प्रमुखांकडे जमा करावे.

कला संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई

## कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
## शासकीय उच्चकला परीक्षा २०२३
## परीक्षा शुल्क- विवरणपत्र-ब

| अ.क्र. | परीक्षा/अभ्यासक्रम | परीक्षा केंद्रांनी व सहभागी कला संस्थांनी ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे परीक्षा शुल्क |
|---|---|---|
| 1 | Intermediate Sculpture & Modelling | 960 |
| 2 | Diploma Sculpture & Modelling | 1410 |
| 3 | Diploma Textile Design (Printing & Dyeing) | 960 |
| 4 | Diploma Textile Design (Weaving) | 960 |

कला संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई